# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ३८२-२०२४** **दिनांक :- १४/१०/२०२४**

## "सोनसाखळी चोरी करणाऱ्या ०२ आरोपीतांसह ०१ महीला आरोपीतास अटक करुन, १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.०१/१०/२०२४ रोजी १९:४५ वा. चे सुमारास विरार स्टेशन ते सेंन्टपीटर स्कूल रोड, विरार(पु.),ता.वसई, जि.पालघर येथे तक्रारदार हया पायी चालत जात असतांना, त्या रिध्दी सिध्दी अर्पामेन्ट समोर आल्या असता, त्यांचे पाठीमागुन एक स्कुटी मोटार सायकल वरुन तीन अनोळखी इसमांनी येवुन, त्यांचे गळयातील सोन्याची चैन जबरीने हिसकावुन घेवुन, पळुन गेले बाबत तक्रारदार दिल्याने, त्यावरुन विरार पो.ठाणे, गु.रजि.नं. I ७१९/२०२४, भारतीय न्याय संहीता- २०२३ चे कलम-३०९(२) प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

सदर जबरी चोरी गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन, मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार विरार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच घटनास्थळी भेट देवुन, घटनास्थळाचे आजु-बाजुस मिळालेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे आरोपीचा सातत्याने ३ दिवस मागोवा घेवून सुमारे २०० सी.सी.टि.व्ही. कॅमेऱ्यांची पडताळणी केली असता, सदरचा गुन्हा करणारे अनोळखी इसम हे शिर्डी नगर, आचोळे, नालासोपारा पुर्व या परीसरातील असल्याचे निष्पन्न झाले. नमुद अनोळखी आरोपीतांचा गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेतला असता, नमुद आरोपीत हे आचोळे गावचे डोंगरावरील झाडी-झुडपांमध्ये लपवुन बसलेले असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने, लागलीच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर डोंगर परिसरात सापळा रचुन शिताफिने आरोपीत नामे. **१)शुभम जाधव, वय-२२ वर्षे, २) महिला आरोपी वय-२० वर्षे,** व **विधीसंघर्षीत बालक** यांस ताब्यात घेतले आहे, व आरोपीत नमुद गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपीत व विधीसंघर्षीत बालक यांचेकडे बुध्दी कौशल्यपुर्वक चौकशी त्यांचेकडून- १)एकुण- **१८.०० ग्रॅम सोन्याचे चैन,** असा **१०० टक्के मुद्देमाल** हस्तगत केलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोलीस उप निरीक्षक/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, उत्कर्ष सोनवणे तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पोहवा/नामदेव ढोणे, व पोअं/सोहेल शेख यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

-----०००-----